संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
(नॅकद्वारा ‘अ’ मानांकन प्राप्त)
जनसंपर्क विभाग

## विद्यार्थ्यांनो नोबेल, ऑस्कर मिळवा - शंकरबाबा पापळकर
## प्रेरणा राज्यस्तरीय नेतृत्व गुण विकास प्रशिक्षण शिबिरात उद्‌बोधन

अमरावती.

भारतापेक्षा इतर देशात नोबेल पारितोषिक, ऑस्कर पुरस्कार मिळविणाऱ्यांची संख्या अधिक आहे. एक भारतीय म्हणून प्रत्येक विद्यार्थ्यांनी नोबेल व ऑस्कर मिळविण्याची प्रतिज्ञा करावी आणि त्यासाठी परिपूर्ण प्रयत्न करावे आवाहन स्व. अंबादास वैद्य मुक - बधीर आश्रम, वझ्झरचे संचालक श्री शंकरबाबा पापळकर यांनी केले. रा.से.यो. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र राज्य आणि विद्यापीठाचा रा.से.यो. विभाग यांचे संयुक्त विद्यमाने प्रेरणा राज्यस्तरीय नेतृत्व गुण विकास प्रशिक्षण शिबीराचे आयोजन करण्यात आले, त्याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर, माजी लेडी गव्हर्नर डॉ. कमलताई गवई, श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय, कारंजा लाडचे प्राचार्य डॉ. सुभाष गवई, रासेयोचे संचालक डॉ. राजेश बुरंगे, आकाशवाणीचे संजय ठाकरे, किशोर केडीया आदी मान्यवर उपस्थित होते.

शंकरबाबा पापळकर म्हणाले, भारत देश महात्मा गांधीचा असून देशाचे पंतप्रधान स्वच्छता कर्मचाऱ्यांचे पाय धुवून सन्मान करतात, तपोवनचे दाजी साहेबांनी आयुष्यभर सेवाकार्य केले. संत गाडगेबाबांनी दशसूत्रीच्या माध्यमातून जीवन जगण्याचा मंत्र दिला. या संतांच्या कार्यातून व विचारातून प्रेरीत होऊन आपला विद्यार्थी संस्कारक्षम झाला पाहीजे.

दरवर्षी एक लक्ष मुली विकल्या जातात, हे दुर्देव आहे. १२३ अनाथांचा मी बाप आहे. पद्‌मश्री श्री प्रभाकरराव वैद्य दर महिन्याला एक लक्ष रुपये देतात, त्यातून सर्व अनाथ मुलांचे पालन-पोषण करण्याच्या सेवेचे मला भाग्य लाभते. मती-मंदांना आरक्षण न देता त्यांच्या पूनर्वसनासाठी शासनाने योजना आखाव्यात अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. याशिवाय सर्व विद्यार्थ्यांना ‘मी नोबेल पारितोषिक मिळविन’, ‘ मी ऑस्कर पुरस्तार मिळविन’ अशी प्रतिज्ञा दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची समपर्क उत्तरे बाबांनी दिली.

लोकसभेच्या अध्यक्ष सौ. सुमित्राताई महाजन यांनी पाठविलेला अहेर कुलगुरू डॉ. मुरलीधर चांदेकर यांनी नवदाम्पत्यांना अर्पण केला आणि त्यांच्या पत्राचे वाचन केले. अध्यक्षीय भाषण करतांना ते म्हणाले शंकर बाबांच्या बोलण्यात कतृत्वाची जोड आहे. ते समाजाचे मोठे शिक्षक असून जीवन कसे जगावे ही प्रेरणा त्यांचेकडून मिळते. बाबांच्या कार्यापासून सामाजिक प्रेरणा आमचे विद्यार्थी घेतील असे आवाहन त्यांनी याप्रसंगी केले.

संत गाडगे बाबांच्या प्रतिमेचे पूजन दीप-प्रज्वलन करण्यात आले. प्रास्ताविक रा.से.यो. संचालक डॉ. राजेश बुरंगे यांनी केले. संचालन डॉ. नरेंद्र माने, डॉ. प्रसाद मडावी यांनी केले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी रासेयोचे श्री राजेश पिदडी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला खा. अडसुळ साहेबांचे स्वीय सहाय्यक श्री सुनील भालेराव, नगरसेवक प्रदीप बाजड, संदीप बोडबोले, सुरेश जैन, संचालक डॉ. श्रीकांत पाटील, संचालक डॉ. दिनेश सातंगे, रासेयो कार्यक्रम अधिकारी, संपुर्ण महाराष्ट्रातील ३२ विद्यापीठामधील १५२ विद्यार्थी उपस्थित होते.

---

प्रति,

**जनसंपर्क विभाग**

दि. २५/०२/२०१९.

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी
दै............................... अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी